| MHLA120007172026 | **दिवाणी कि. अर्ज २५९/२०२६**<br>**माधव व इतर वि.निरंक** |
| --- | --- |

**निशाणी क्र.१ वर आदेश**

सदरचा अर्ज अर्जदार **क्र.१/१ व १/२** हे मयत **ग्यानबा पांडुरंग ऊर्फ पांडबा रोडे** यांचे कायदेशीर वारस असलेबाबत प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज व त्यासोबत अर्जदार यांचे शपथपत्र नि.क्र.१२ आणि नि.क्र.४ सोबत दाखल केलेल्या दस्तऐवजाचे अवलोकन केले.

०२. अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार क्र.१/१ व १/२ हे मयत ग्यानबा पांडुरंग ऊर्फ पांडबा रोडेयांचे वारस आहेत. अर्जदाराचे असे कथन आहे की, त्यांनी यापुर्वी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी कधीही अर्ज केला नाही. अर्जदारांना सदरचे वारसा प्रमाणपत्र शासकीय/निमशासकीय योजनेचा लाभ मिळण्याकरीता आवश्यक आहे. अर्जदारांचे राहण्याचे ठिकाण हे या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात आहे. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर सदर अर्जाचा जाहीरनामा दि.**२१/०३/२०२६** रोजीच्या **दैनिक रत्नापूर** या वर्तमानपत्रामध्ये नि.क्र.११ प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेला असून सदर अर्जाची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहीर नोटीस व तामिलबाबतचा अहवाल प्रकरणात दाखल असून सदर नि.क्र.११ वरील जाहीरनामा व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आजपर्यंत अर्जातील मागणीबाबत कोणत्याही व्यक्तीनी हरकत दाखल केलेली नाही. अर्जदारांनी **ग्यानबा पांडुरंग ऊर्फ पांडबा रोडे हे** दि.**१९/०७/१९९५** रोजी मयत झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी क्र.६ तसेच अर्जदारांनी वारसाचे शपथपत्र दाखल केले आहे.

०३. सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार क्र.१/१ व १/२ तर्फे अर्जदार क्र.**१/२ मारुती माधव रोडे** यांनी नि.क्र.१२ वर सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील संपुर्ण मजकुराचा पुनर्उल्लेख केला व असे नमुद केले की, तो, अर्जदार

क्र.२ हे मयताची मुले आहेत. अर्जदारांव्यतिरीक्त मयतास इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे.

०४. अर्जातील संपुर्ण कथन, अभिलेखावरील कागदपत्रे व अर्जदारांचा पुरावा यांचे अवलोकन केले असता असे आढळते की, मयत ग्यानबा पांडुरंग ऊर्फ पांडबा रोडेहे वर नमुद तारखेला मयत झाले असून अर्जदार हे मयताचे वारस आहेत. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा अर्ज केल्याचे आढळून येत नाही. अर्जातील मागणी संदर्भात अद्याप कोणीही हरकत नोंदविलेली नाही. अर्जदारांच्या वतीने देण्यात आलेल्या जाहीर नोटीसचा दैनिक रत्नापूर या वर्तमानपत्राचा अंक नि.क्र.११ अभिलेखावर दाखल आहे. यावरुन असे आढळते की, अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस आहेत. म्हणून ते मुंबई रेग्युलेशन कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| ०२. | अर्जदार क्र.१/१ व १/२ हे मयत ग्यानबा पांडुरंग ऊर्फ पांडबा रोडे यांचे कायदेशीर वारस असलेबाबत प्रमाणपत्र योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.09 17:09:43 +0530

**(श्रीमती. ए.एस. गुंजवटे)**

दिनांकः–०९.०६.२०२६.

सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर,
(न्यायालय क्र.१) निलंगा